
# Studies in Indian Place Names (SIPN) with ISSN 2394-3114



Studies in Indian Place Names (SIPN) with ISSN 2394-3114 is UGC Care listed journal for research publication. SIPN considers review and research articles related to Social Science and Humanities: Arts and Humanities, Physical Education, Library Science, History, Anthropology, Management, Commerce, Home Science, Sociology, Hotel Management, Tourism, Mass Communication, Accounting, Education, Economics, Law, Philosophy, Finance, Political Science, Visual Arts, Performing Arts, English, Science: Engineering (All Branches), Psychology, and Architecture, Geography and Geology, Agricultural, Biological Sciences, Environmental Science, Ecology, Archaeology, Biodiversity and Conservation, Entomology, Health Science: Medicine and Dentistry, Nursing and Allied Health Science, Ayurveda. On behalf of Studies in Indian Place Names, I would like to extend my regard to all fellow researchers and scholars and wish prosperity in their field. Published by: The Place Names Society of India, NPS India

Send papers for publication to editor@tpnsindia.org

ISSN 2394-3114

An International Registered & Refereed Monthly Research Journal

# Studies in Indian Place Names

## UGC Approved Journal
## UGC Care Journal

## The Place Names Society of India
## TPNS India

09

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

# ऋतुमितवा : एक आशयसंपन्न काव्यसंग्रह

प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी
(मराठी विभाग)
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

मानवी भावनांचा निसर्गाशी नातं सांगणारा, सुसंवाद साधणारा व एकरूपता पावणारा दर्जेदार कवितासंग्रह म्हणजे ऋतुमितवा होय. साहित्य समाजाचा आरसा असतो, त्याचे प्रतिबिंब साहित्यातून पडत असतात. कोणतेही साहित्य कलाकृती हे त्या समाजाचे अपत्य असते. मानवी जीवन सहजसुंदर आहे. आपल्या भावभावनांचा उत्कट आविष्कार म्हणजे कविता असते निसर्गाचे मनाशी असलेलं जवळच जिवाभावाचं नातं काव्याच्या माध्यमातून कवयित्री सौ.तनुजा ढेरे यांनी अधोरेखित केलेला कवितांचा एक परिपाक म्हणजे ऋतुमितवा हा होय.

मराठवाड्यातील साहित्य त्यातील दर्जेदार अशा प्रकारची नवोदित कवींची मांडणी आपणास पहावयास मिळते यामध्ये कमलताई नलावडे, वृषाली किन्हाळकर, उर्मिला चाकुरकर, शैलजा कारंडे, सोनाली दिक्षीत, कविता पुदाले, कविता मुदकन्ना व सुवर्णा तांवारे अशा कवयित्री या विविध पैलुतून लिहीत आहेत.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

- समकालीन कविता व प्रस्तुत कवितासंग्रहाचे वेगळेपण समजून घेणे.
- निसर्गाविषयी असलेला कृतज्ञ भाव विचारात घेणे.
- वर्तमान काळातील कविता व त्यातील आशय समजून घेणे.
- समकालीन कवितेत तनुजा ढेरे यांच्या कवितेचे स्थान लक्षात घेणे.

**शोध निबंधाची गृहीतके :**

- समकालीन कविता व प्रस्तुत कवितासंग्रहातील कवितांचा आकृतिबंध अनेकांनी रेखाटला आहे.
- ऋतुमितवा काव्यसंग्रहाचे वेगळेपण दिसून येते.
- ऋतुमितवा मधील कवितांचा आशय व्यापक आहे.
- प्रस्तुत कविता या निसर्गाप्रती एकरूप होणाऱ्या कविता व त्यांचा भाव विशद करणाऱ्या आहेत.
- वर्तमान काळात कवयित्री तनुजा ढेरे यांच्या कवितेत असलेले सामर्थ्य आहे.

**संशोधन पद्धती :**


Copyright © 2020Authors

Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

प्रस्तुत शोध निबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषनात्मक अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधन सामग्री म्हणून प्रकाशित संदर्भ ग्रंथाचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय प्रवेश :**

कवितेची निर्मिती ही एखाद्या भावनांच्या संवादातून, तितकीच ती वेदनेतून होत असते. कविता आपल्या मनाची उकल करण्यासाठी निर्माण झालेली असते. कवितेतून मांडत असतानाच माता-मातृभूमीला वंदन करून लिहिलेल्या कविता निखळ यशदायी ठरतात. प्रांत भाषा परिसर व परिस्थितीच्या पलीकडे जाऊन शब्दांची व्यवस्थित मांडणी करणे ही भूमिका निसर्गातील घडामोडींचे ऋतुंचे सृष्टीतील बदलांचे, परिवर्तनाचे शब्दबद्ध केलेली उत्कट अशी काळीज तळहाती घेऊन रचना केलेली प्रस्तुत कविता होय. ही कविता व वाचक मनाचा वेध घेणारी कवी हा देखील संवेदनशील मनाचा हळवा असतो, तो आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटना, घडामोडी संदर्भात आपले विचार कवितेतून शब्दबद्ध करत असतो.

याच अनुषंगाने सुधीर रसाळ म्हणतात, "अनेकदा कवी कथात्मकता व सलग दृश्यात्मकता नाकारुन केवळ एकत्र आणणाऱ्या भिन्न स्तरावरच्या वस्तूपासून व घटनांपासून बनलेल्या प्रतिमा संघटीत करून एक व्यामिश्र सखोल व सूक्ष्म अशा भावावस्थेचा प्रत्येय घडविण्याचा प्रयत्न अनेकदा कवितेत केला जातो."

आपली नवनिर्मिती करीत असतो कविता लिहिणे म्हणजे निवड शब्दांची केलेली आरास अथवा मांडणी नसते, तर ती कुणावर तरी केलेल्या प्रेमाचे ते प्रतीक असते. अशावेळी आपल्या भावना शब्दांकित करण्यासाठी सर्वात जवळचे माध्यम म्हणजे कविता असते. यातील श्रावण, पाऊस, सर धुक्याची, थेंब, हिरवळ, पानगळ, चैत्र पालवी, चैत्र मास, गुलमोहर, मितवा, सोनचाफा, ऊन , वसंत, प्रितसागर, हिरवी मने आदी उदाहरणादाखल विचारात घेता येतात. एकूणच ऋतुमितवा या कवितासंग्रहातील कविता म्हणजे निसर्गाशी जोडली जाणारी अनेक प्रतिमा-प्रतीक यांचा अंतर्भात यांत केलेला आहे.

प्रस्तुत कवितासंग्रह डिंपल पब्लिकेशन ठाणे यांच्या वतीने प्रकाशित केला, असून प्रा.अशोक बागवे यांनी त्या कवितासंग्रहाची प्रस्तावनेतून पाठराखण केली आहे कवयित्री सौ.तनुजा ढेरे यांचा पहिला काव्यसंग्रह घनश्यामल रेखा आहे, तर ऋतुमितवा हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह प्रस्तुत काव्यसंग्रहाची पृष्ठ संख्या 128 प्रस्तुत असून त्यात 105 कवितांचा समावेश आहेत. त्याचे स्वागत मूल्य रुपये 150 असून सर्व कविता निसर्गाशी आपला भाव व्यक्त करणाऱ्या असून त्या सामाजिक आशयाच्या आहेत. समकालीन परिस्थितीत अनेक कवी साहित्यिक उदयास येत आहेत. संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढ ही कवितासंग्रहातील कविता निसर्गातील अनुबंध-प्रतीक यांच्या माध्यमातून समृद्ध झालेल्या आहेत आणि


Copyright © 2020Authors
Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

अनेक अनेक शब्द हे ग्रामीण जीवनाशी वास्तव नातं जोडणारे आहेत. मानवी समाजजीवनातील असे अभिव्यक्तींचे वर्णन काव्यातून समर्पकपणे आले आहे. ग्राम संस्कृती व निसर्ग संस्कृती यांचे समांतर चित्रण यात केले आहे. विषयावर नादमाधुर्य केलेल्या, या कवितांचा केंद्रबिंदू म्हणजे निर्सग हा आहे, आपण नेहमी म्हणतो निसर्ग महान आहे, जगण व निसर्गाची चक्र यामध्ये समांतर अशी परिस्थिती असते. माणूस लहानाचा मोठा होतो. त्या ठिकाणी निसर्गाचे त्याच्यावर कायम ऋण असतात. अनेक रचनांमधून आपण निसर्गावर निखळ प्रेम करावे निसर्ग दाता आहे, जगा व जगू द्या असा संदेश या काव्यातून दिलेला आहे, प्रत्येक कविता ही स्वतंत्र दर्जाची असून खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या प्रक्रियेत निसर्गाचे संतुलन मोठ्याप्रमाणात बिघडत आहे, असाही एक सूर या कवितेतून कवयित्री सौ. तनुजा ढेरे यांनी रेखाटला आहे, असे असताना या कवितासंग्रहात त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन, प्रचंड आशावाद व्यक्त केला आहे. असल्याने साहजिकच यात प्रगल्भता दिसते, निसर्गाशी नातं जोपासणाऱ्या अधिकांश कविता यात आहेत. अष्टाक्षरी छंद यावर त्या शब्दबद्ध केलेला आहेत. वास्तविक आजच्या परिस्थितीत लेखनाचे भान ठेवून शब्दातून ठराविक पद्धतीने मांडणी करणारे कवी, कवयित्री संख्येने कमीच दिसतात हा एक वेगळया मांडणीतून अभिव्यक्त केलेला प्रयोग म्हणावा लागेल. कवयित्रीने लिहीलेल्या अभिनव कवितेतून हा प्रयोग सार्थ करून दाखवला आहे. ऋतु विषयीची निसर्गातील होणाऱ्या बदलाची नांदी अचूकपणे टिपले आहेत, खरेतर साहित्यात त्याचे चित्रण समर्पकपणे येथे त्यांच्या कविता म्हणजे प्रामाणिक व प्रांजळ भूमिकेतून केलेले निसर्गाप्रतीचे सौंदर्याचे वर्णन आहेत. त्या पुढील काव्यात म्हणतात,

*"हा शुभ्र निळा पाऊस*
*हा मंद ढगांचा वारा*
*आणि सरी फुलांच्या धारा"*

सर्वच सजिव निसर्गावर अवलंबुन असतात. आपण नेहमीच म्हणतो निसर्ग श्रेष्ठ आहे, दाता आहे, त्याचे वेगळीपण अनेक प्रस्थापित कवींनी टिपलेले आहे. ज्याप्रमाणे ज्येष्ठ साहित्यिक व निसर्गकवी ना. धो. महानोर आपल्या कवितेत म्हणतात,

*"या नभाने या भुईला दान द्यावे*
*आणि या मातीतून चैतन्य गावे*
*कोणती पुण्य अशी येती फळाल*
*जोंधळयाला चांदणे लगडून जावे॥"*

त्याचप्रमाणे ऋतुमितवा कवितासंग्रहात कवयित्री सौ. ढेरे लिहितात, त्याही मुक्तपणे सृष्टीतील सृजनाचा आविष्कार, बदलत्या ऋतुप्रमाणे निसर्गाचे फुलणारे सौंदर्य यांचे होणारे यथार्थदर्शन पुढीलप्रमाणे

*"दृश्य पाहुनी मोहक*


Copyright © 2020Authors



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

*मन भारावून जाते*
*सर्व मोत्यांची टपोर*
*डोळ्यातून टपकते"*

तसेच हाच अनुबंध पुढे जोडून पशुपक्षी सृष्टीमध्ये मोकळ्या आसमंतात विहारताना त्या लिहितात

*"थवे पाखरांचे उंच*
*उंच आकाशी उडती*
*मागोमाग पावलंही*
*ढगांच्या भिरभिरती"*

निसर्ग आपल्या प्रत्येक कार्यात नित्यनेमाने भूमिका बजावत असतो, मात्र त्याप्रमाणेच आपल्या मनाची ओढ सुद्धा त्यातून विषद होते अशी एक मंत्रमुग्ध करणारी कविता,

*"कशी सांगू तुला सख्या*
*तुझी ओढ किती आहे*
*सांग केशरी नभात*
*तशी माझी प्रित आहे"*

असलेली प्रीत निखळ स्वरूपाची आहे निसर्गाशी एकरूप झालेलं चित्र त्याप्रमाणेच नाते मानवी मनाशी जडलेले आहे, अशी तादात्म्य पावलेली उदात्त भावना.

*"कसं सांगावं कुणाला*
*किती बांधव मनाला*
*तुझी प्रीत ह्रदयात*
*रात दाटते उशाला"*

याचप्रमाणे वसंत या कवितेत सृष्टीतील ऋतुने सभोवार अनेक बदल होतात. ते बदल डोक्यात, मनात भरावेत अशाच प्रकारचे आनंददायी असतात. अशी भावना पुढीलप्रमाणे,

*"आला वसंत अंगणी*
*गंध फुलला जीवनी*
*मन बावरे... सुगंधी*
*धावु लागे रानोरानी"*

तसेच आपल्या जीवनात माझ्या तुझ्या विरहाने असह्य वेदना होत आहेत, त्यातून मला काहीही भाव सूचनासे झाले आहेत, असा भाव पुढील कवितेतून अधोरेखित करताना

*"नको दुसरं काहीही*
*आस तुझीच जीवाला*


Copyright © 2020Authors



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

*शिशिरातल्या सावल्या जाळी पोरक्या रानाला"*

प्रस्तुत कवितासंग्रह निसर्गावर भरभरून प्रेम करणारा आहे. मानवाचे निसर्गाचे अनुबंध वेळोवेळी प्रकट करणार आहे. थोडक्यात निसर्गाला वाहिलेला कवितासंग्रह असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. रंग, रूप, रस व गंध यांचे नाते हृदयस्थ भाववंधासोबत जोडलेले आहेत. त्यातून एकरुपतेचे दर्शन घटविण्याचा कवयित्रीचा मानस असल्याचे स्पष्ट होते.

*"रुते पापण्याची ओल*
*काळजात खोलवर*
*मंदवारा पहाटेला*
*वाहताना ओलसर "*

खऱ्या अर्थाने सृष्टीतील होणारे हे अनामिक बदल फुलणारे नवचैतन्याचा आविष्कार सर्वत्र अवतीर्ण होणारे सुंदर सुजलाम-सुफलाम दृश्याचे ही वर्णन अनेक काव्यातून अभिव्यक्त झालेले आहे. अशाच एका कवितेत या सर्व भावभावनांचे पकड कवयित्री शब्दातून कवेत घेताना दिसते.

*"ओढ तुझी अनामिक हृदयअंतरी*
*तू जाणतो खेळ सारे मनअंतरी*
*तरीका छळतो मज बावरी*
*अजून कसा जिवलगा तू येत नाही माघारी*
*तूच माझा प्रीत सखा मम हृदय मंदिरी"*

मानवी जीवनात अनेक नातेसंबंधांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. निसर्गाचे दातृत्व असणारे एक नाते म्हणजे आई व लेकराचे असते. त्यांनी निखळ, निस्वार्थी प्रेममयी नात्याची वीण आई या कवितेतून शब्दबद्ध झाली आहे, तिचा त्याग त्यातून अभिव्यक्त झाला आहे.

*"आई उभा जन्म दु:ख*
*काळजात दडवले*
*सुख डोळ्यात बांधून*
*माय जीव जगवले"*

आपल्या दैनंदिन जीवनात जन्मापूर्वीपासून ते अखेरपर्यंत सर्वाधिक प्रेम करणारे एकच नाते ते म्हणजे माय माऊलीचे, आपल्याला लहानाचं मोठं करण्यासाठी ते अनंत कष्ट घेतले, तळहातावरील फोडाप्रमाणे जपते, असे एक नातं मुलीचे माय तिचे कुटुंबातील अस्तित्व पुढील प्रमाणे असते.

*"जशी तुळस मंजिरी*
*तनु गंध फुललेले*
*माय तुझ्या सुवासाने*


Copyright © 2020Authors

१२५

Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

*घरदार वहरलेले"*

समाजजीवनात नातेसंबंधांना अनन्यसाधारण अशा प्रकारचे महत्त्व आहे, आपल्या दैनंदिन जीवनात पती-पत्नी यांचे नाते तसेच नव्याने संसाराला प्रारंभ केल्यानंतर आई -वडीलांचे स्नेहबंध सोडून कर्तव्यार्थ ज्यावेळी नववधू जाते, त्यावेळी तिचे माहेर विषयीचे जे मत असते, ते हळव्या स्वरूपाचे प्रेममयी असते याच संदर्भातील भावना माहेरच्या वाटेवर या कवितेतून अलौकिक विचारांचे विश्व लौकिक पातळीवरून ती मांडते.

*"माहेरच्या वाटेवर*
*नदी वाहे झुळझुळा*
*उभा पिंपळा अंगणी*
*ऊन सावल्यांचा खेळ*
*मागे वळू पाहता*
*गोड आठवांचा पूर*
*पुढे पाऊल टाकता*
*मन हळवं अंबर"*

आपल्याला अपेक्षित असणाऱ्या व्यक्तीची भेट जेव्हा होते, तेव्हा मनात वेगळाच भावतरंग तयार होतो आनंदाला पारावार उरत नाही, अशा आठवणीच्या कप्प्यात ठेवण्यासाठीचे प्रसंग आपण अनुभवत असतो याच अनुषंगाने भेट ज्यावेळी निश्चित होते. त्यावेळी तो क्षण कायम तसाच स्थिर रहावा असेही आपल्याला वाटत असते.

*"तुझी भेट झाली तेव्हा*
*श्रावण हिरवा होता*
*ऊन पावसाचा खेळ*
*पानात रंगला होता"*

तसेच तो मनीचा असणारा भाव विशद करताना पुढील सुंदर अशा शब्दांमध्ये कवयित्री रेखाटते.

*"मन माझे गाते सख्या*
*तुझ्यासाठीच हृदयातून*
*शब्द-शब्द चांदणं मी*
*गुंफते काळजातून"*

माणूस समाजशील प्राणी असून निश्चितच तो उत्सवप्रिय आहे. आपल्या रोजच्या जीवनात अनेक सण -समारंभ-प्रथा-परंपरा यांना आपण महत्त्व देतो. याच अनुषंगाने प्रस्तुत कवितासंग्रहात दिवाळी सण विषयीचे वर्णन अतिशय यथोचित आले आहे. आजही ग्रामीण भागात वर्षभर अनेक कष्टाची कामे


Copyright © 2020Authors



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

झाल्यानंतर सर्वात मोठा सण येतो. तो म्हणजे दिवाळी होय गोर-गरीब, अबाल-वृद्ध सर्वांना हर्ष उल्हासित करणारा तो सण आहे. याच बाबतीत कवयित्री म्हणते,

*"सण वर्षाचा दिवाळी*
*साज चढल्या कमानी*
*घर खिडक्या सजल्या*
*रंगीबेरंगी दिव्यांनी दिव्यांनी*
*घरदार उजळते*
*लक्ष्मीच्या पावलांनी*
*पाडव्याला ओवाळते*
*घर धन्यास हौसेने"*

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये प्रेमाला उच्चतर स्थान आहे. माय-लेकरू, पती-पत्नी, भाऊ-बहीण यांच्यातील प्रेम असे अलौकिक दर्जाचे आहे. पती-पत्नी विषयी आयुष्यभर सोबत करताना ती म्हणते,

*"कसे सांगू तुला जे सांगायचे होते ते मनातच राहिले*
*शब्द येता येता ओठातच राहिले"*

अशा प्रेमळ संसारी जीवनाच्या यशात कधी-कधी अनामिक भेटीची ओढ , हुरहुर लागलेली असते, ती आपल्या सख्याला म्हणते,

*"कशी सांगू तुला सख्या रे*
*तुझी ओढ किती आहे*
*सांग केशरी नभात*
*तशी प्रीत माझी आहे"*

तसेच या संदर्भाने आणखी व्यापक आशय असणारी काव्यरचना पुढीलप्रमाणे दिसतात,

*"दिस रात तूच मनी*
*सारे कळते तुलाही*
*दुपार ती ढळताना*
*सांज छळते मला ही"*

**समारोप व निष्कर्ष :**

कवयित्री सौ. तनुजा ढेरे यांच्या ऋतूमितवा या काव्यसंग्रहातील काही निष्कर्ष याठिकाणी पुढील प्रमाणे सांगता येतील.

1) कविता ही निसर्गावर प्रेम करायला लावणारी निसर्गाचे प्रतिमा-प्रतीक यांच्यावर आधारलेली आहे.

2) कवितासंग्रहात माणूस व निसर्गाचे नाते कसे अतूट आहे ते स्पष्ट केले आहे.


Copyright © 2020Authors



Scanned with OKEN Scanner

3) त्यांची कविता हे खऱ्या अर्थाने निसर्ग हा माणसाला आयुष्यभर एक प्रकारे मदत करत असतो निसर्गाचे आपल्यावर ऋण असतात याची जाणीव विशद करणारी कविता आहे.

4) आपल्या बदलत्या परिस्थितीमध्ये निसर्गाचे संतुलन बिघडत चालले आहे. यासंदर्भात सुद्धा संवेदनशील मनाने त्यांनी आपल्या कवितेतून वेध घेतला आहे.

5) भाषिक दृष्टीने साधी सरळ सोपी शब्दांची मांडणी तसेच लयबद्ध अशा प्रकारची रचना हे कवितेचे वेगळेपण आहेत. भाषाशैली, नादमाधुर्य, आशयसंपन्न व गेय स्वरूपाच्या आहेत. वाचक मनाचा वेध घेणाऱ्या असून आकलन आणि आस्वाद या दोन्ही स्तरावर ही कविता स्थिरावते.

त्यांच्या कविता पाहून निसर्गाप्रती व्यक्त केलेल्या भावना यात वारंवार दिसतात. निसर्गाच्या सौंदर्याशिवाय, झाडाला, घराला, मनालासुद्धा सुंदरता प्राप्त होत नाही. माया, ममता, आपुलकी, त्याग व निरागसता या सर्वच गोष्टी आपणास निसर्गापासून शिकायला मिळतात. निसर्गात प्रामाणिकपणा जसा गुण आहे, रोज नवी पालवी फुटते त्याप्रमाणे प्रत्येकाने समाजोपायोगी कार्य करण्याची प्रेरणा या माध्यमातूनच मिळते. येथे विं. दा. करंदीकरांच्या कवितेची आठवण होते.

*"देणाऱ्याने देत जावे*
*घेणाऱ्याने घेत जावे*
*घेता घेता देण्याऱ्याचे हातच घ्यावेत"*

ज्या पद्धतीने इंद्रजीत भालेराव, विठ्ठल वाघ, ना. धो. महानोर, फ . म . शहाजिंदे अशा ज्येष्ठ कवींच्या रचना प्रमाणेच वाटचाल करणारी ही प्रगल्भ कविता आहे. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये आपण अनेक सण समारंभ निसर्गाचे उत्तरदायित्व म्हणून साजरे करतो. याचाही अनुबंध वेगवेगळ्या कवितेतून कवयित्री घेतलेला आहे. थोडक्यात ही कविता म्हणजे आशय संपन्न दर्जाची उत्कृष्ट कविता आहे. त्यांच्या पुढील साहित्यिक व लेखन विषयक प्रवासास अनंत शुभेच्छा.

समाजात स्त्री-पुरूष असे निसर्गाने दोन घटक निर्माण केले आहेत. यात श्रेष्ठ कोण असा वेळोवेळी प्रश्न उपस्थित केला जातो. परंतु पुरूषसत्ताक संस्कृतीने एकेकाळी स्त्रीयांना दुय्यम दर्जा दिला. मात्र आज शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून झालेल्या अपुर्व क्रांतीने महिला न्यायाधिश, डॉक्टर, इंजिनिअर, वकिल, प्राध्यापक, वैमानिक अशा अनेक क्षेत्रात आपले अद्वितीय स्थान निर्माण करीत आहेत. बऱ्याच महिला परंपरागत परिघाच्या बाहेर जाऊन लिहीते होत आहेत. हा बदल विधायक स्वरूपाचा आहे. त्यांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांनी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरत आहे. चूल आणि मुल एवढ्याच परंपरेत न राहता महिला स्त्रीवादी साहित्यातून अभिव्यक्त होत आहेत. त्यातही आपली भूमिका मोठ्या प्रमाणात कवितेतून रेखाटत आहेत. हे चित्र म्हणजे आधुनिक काळातील स्वातंत्र्यानंतर झालेले परिवर्तनाचे चित्र आहे.


Copyright © 2020Authors



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-38-March-2020

संदर्भ :

1) सुधीर रसाळ कविता आणि प्रतिमा मौज प्रकाशन गृह खटाववाडी गिरगाव मुंबई 3 आवृत्ती मे 2011 पृष्ठ 330

2) सौ.ढेरे तनुजा, ऋतुमित्तवा (26 डिसेंबर 2019) डिंपल पब्लिकेशन, ठाणे

3) www.google.com


Copyright © 2020Authors

229

Scanned with OKEN Scanner